# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com फोन क्रमांक – 07172-250659

क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/685 दिनांक :- 11 जुलै, 2020

---

**संदर्भ** :- 1. महाराष्ट्र शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अधिसुचना क्रं.डीएमयु/2020/सीआर-92/डिआयएसएम-1 दिनांक 29.06.2020.

2. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/645 दि.30.06.2020.

## -: आदेश :-

उपरोक्त संदर्भांकित क्रं. 01 वरील राज्य शासनाकडील आदेशाचे अनुषंगाने, या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 02 वरील टाळेबंदी आदेशामधील परिच्छेद क्रं. 09 प्रवास व प्रवासी वाहतुकी संबधाने उपपरिच्छेद (iii) अन्वये " महानगरपालिका/नगरपालिका, नगर पंचायत क्षेत्राकरिता प्रवासी वाहतुकीकरिता रिक्शा/ॲटोरिक्शा चालक व दोन प्रवाश्यांसह रिक्शा/ऑटोरिक्शा ची वाहतुक सुरु राहील परंतु रिक्शा/ॲटोरिक्शा मध्ये सॅनिटायजर ठेवणे व मास्कचा वापर करणे बंधनकारक आहे. आणि सदर वाहतुक ही ग्रामीण क्षेत्राकरिता लागु राहणार नाही " असे आदेशीत केलेले आहे. **त्यामध्ये आता पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-**

**आता चंद्रपूर जिल्हयात महानगरपालिका/नगरपालिका/नगर पंचायत/ग्राम पंचायत क्षेत्रामध्ये प्रवासी वाहतुकीकरिता रिक्शा/ॲटोरिक्शा यांची वाहतुक चालक व दोन प्रवाश्यांसह सुरु करण्यास याव्दारे परवानगी देण्यात येत आहे.**

**परंतु सदर रिक्शा/ॲटोरिक्शा मध्ये सॅनिटायजर ठेवणे आणि चालक व प्रवासी यांनी कायम मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील. तसेच सदर वाहतुकीस रात्री 09.00 ते सकाळी 05.00 या कालावधीत मनाई असेल.**

सदर निर्देशाचे पालन न केल्याचे आढळून आल्यास साथरोग प्रतिबंधक कायदा 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188, 269, 270, 271 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार करावाई करण्यात येईल.

सदरचा आदेश संपुर्ण जिल्हयात दि. 11/07/2020 ते दि. 31/07/2020 या कालावधीत लागु राहतील.

**सदरचा आदेश माझे सही व शिक्यानिशी दिनांक 11.07.2020 रोजी निर्गमीत करीत आहे.**

Khemnar

(डॉ. कुणाल खेमनार)

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव**

1. मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
4. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
5. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर
7. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
8. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
9. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
10. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)

**सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

Khemnar

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर